# डेट पाममधून मिळणारे उत्पन्न व खर्च (प्रति एकर)

**झाडांमधील अंतर : 9 X 9 मीटर्स** — **झाडांची संख्या = 50**

| तपशील/वर्ष | 1st | 2nd | 3rd | 4th | 5th | 6th | 7th | 8th | 9th | 10th | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| फळ उत्पादन (कि.ग्रा.) | 0 | 0 | 0 | 30 | 50 | 80 | 120 | 160 | 200 | 200 | |
| उत्पादन/एकर (कि.ग्रा.) | 0 | 0 | 0 | 1500 | 2500 | 4000 | 6000 | 8000 | 10000 | 10000 | |
| दर/कि.ग्रा. | 0 | 0 | 0 | 45 | 45 | 45 | 45 | 45 | 45 | 45 | |
| एकूण उत्पन्न रू. | 0 | 0 | 0 | 67500 | 112500 | 180000 | 270000 | 360000 | 450000 | 450000 | 1890000 |
| खर्च | | | | | | | | | | | |
| मजुरी खर्च रू. | 7500 | 8000 | 9500 | 15000 | 17500 | 20000 | 25000 | 30000 | 35000 | 40000 | |
| साहित्य खर्च रू. | 4000 | 4500 | 9000 | 10000 | 12500 | 15000 | 19500 | 22500 | 27500 | 30000 | |
| खतांचा खर्च रू. | 5000 | 6000 | 8000 | 9000 | 10000 | 11000 | 13550 | 16990 | 18300 | 21665 | |
| एकूण खर्च रू. | 16500 | 18500 | 26500 | 34000 | 40000 | 46000 | 58050 | 69490 | 80800 | 91665 | 481505 |
| एकूण उत्पन्न रू. | -16500 | -18500 | -26500 | 33500 | 72500 | 134000 | 211950 | 290510 | 369200 | 358335 | 1408495 |
| कर्जाचा हप्ता रू. | 18000 | 18000 | 18000 | 18000 | 18000 | 18000 | 18000 | 18000 | 18000 | 18000 | 1800000 |
| कर्जाचे व्याज रू. | 0 | 21600 | 19440 | 15120 | 12960 | 10800 | 8640 | 6480 | 4320 | 2160 | 101520 |
| अंदाजे उत्पन्न रू. | -34500 | -58100 | -63940 | 380 | 41540 | 105200 | 185310 | 266030 | 346880 | 338175 | 1126975 |

**डेट पाम 50-60 वर्षांपर्यंत उत्पादन देते.**

## कच्छ क्रॉप सर्विसेस प्रा. लिमिटेड

# डेट पामची यशस्वी लागवड

## खजूर











वेबसाईट : www.kcslindia.com

## संपर्क


**ऑफिस व नर्सरी - टिश्यू कल्चर लॅबोरेटरी**

महेश नगर समोर, गुंडाला रोड
भुज-मुंद्रा (कच्छ) गुजराथ. पिनकोड - 370421
इमेल : mktg@kcslindia.com

- सुनील वैष्णव : मो. +91 82009 97901 (जनरल मॅनेजर)
- कल्पेश शाह : मो. +91 82009 97902 (मॅनेजर - बिझिनेस डेव्हलपमेंट)
- अरविंद ए. पटेल : मो. 82009 97907 हिरजी पी. राठोड : मो. 82009 97910

# डेट पामची यशस्वी लागवड

## प्रस्तावना :

डेट पामला (खजूर) कच्छमधील 'कल्पवृक्ष' म्हटले जाते आणि त्याची फळे जगभरात प्रसिद्ध आहेत. डेट पामची लागवडी वेगवेगळ्या प्रकारच्या जमिनींत व पाण्याच्या उपलब्धतेनुसार करता येते. एकदा लावल्यानंतर, ते जवळजवळ एका संपूर्ण पिढीसाठी उत्पन्न देते (डेट पामचे आयुष्य अंदाजे 60 वर्षे असते).

## डेट पामचे प्रकार :

फळांचा दर्जा व संख्या लक्षात घेता, टिश्यू कल्चर केलेल्या डेट पामची लागवड करणे योग्य ठरेल. आमच्याकडे टिश्यू कल्चर डेट पामचे दोन प्रकार उपलब्ध आहेत.

1. बार्‍ही (गोल्डन फ्रूट)
2. लोकल एलीट (कच्छ प्रदेशातील लाल व गोल्डन फ्रूट)

हे दोन्ही प्रकार फ्रेश फ्रूट प्रकारातील असून त्यांचे उत्पादन आमच्या मुंद्रा-कच्छ येथील प्रयोगशाळेत केले जाते. आम्ही बार्‍ही प्रकारच्या झाडांची आयात करून शेतकऱ्यांना त्यांचे वितरणही करतो.

## जमीन तयार करणे :

डेट पामची लागवड भातशेतीची जमीन व समुद्रकाठाजवळच्या सॉल्ट पॅन्सच्या जागा सोडून सर्व प्रकारच्या जमिनीत करता येते. मशागतीसाठी पाण्याची गरज असते परंतु दर्जाबद्दल फारशा अटी नसतात.

झाडांमधील अंतर 9 X 9 मीटर्स खड्ड्याचा आकार : 1 X 1 X 1 मीटर

खड्डे खणल्यानंतर त्यांना सुमारे 10 दिवस ऊन लागू द्यावे. त्यात चांगल्या प्रतीचे खत, नदीकाठची वाळू आणि वाळवीविरोधी रसायन घालावे. त्यानंतर हे खड्डे पाण्याने पूर्ण भरावेत. 2-3 दिवसांनंतर झाडे खड्ड्यांच्या बरोबर मध्यभागी लावावीत. ठिबक सिंचनाच्या सहाय्याने झाडांना नियमितपणे पाणी द्यावे. त्यामुळे झाडे मरण्याचे प्रमाण कमी होईल आणि झाडांना फर्टिगेशनद्वारे पोषणही पुरवता येते, ज्यामुळे त्यांची जोमाने वाढ होईल.

## आंतरपीक पद्धत :

9 X 9 मीटर्स अशा पद्धतीने लागवड केल्यामुळे झाडांमध्ये खूप अंतर राहते व त्यामुळे शेतकऱ्यांना झाडांमधल्या जागेचा उपयोग इतर पिकांच्या लागवडीसाठी करण्याचा मोह होतो. आम्ही अशी शिफारस करतो की आंतरपिके घ्यायची झाल्यास फुलशेती, भाज्या, चारा, तेलबिया, डाळी अशी पिके घ्यावीत, ज्यांचा कालावधी कमी असतो आणि त्यांच्यामुळे डेट पामच्या वाढीवर परिणाम होणार नाही.

## पोषण :

रोपे लावल्यानंतर सुमारे 15 दिवसांनी, पिकावर फवारणी करण्यासाठी विरघळणाऱ्या खतांचा उपयोग 19:19:19, 12:61:0, 0:54:34 एनपीके या प्रमाणात करावा. खतांचे वरीलप्रमाणे मिश्रणाचे प्रमाण ठिबक सिंचनाद्वारेही देता येईल.

## पाणी :

रोपे लावल्यानंतर लगेचच, दररोज सुमारे 15-20 लिटर पाणी प्रत्येक रोपाला देणे आवश्यक आहे. उन्हाळ्यात, रोपांना एकाआड एक दिवशी 30 लिटर पाणी दिले पाहिजे. मोठ्या झाडांना फुले/फळे धरण्याच्या वेळेस एकादिवसाआड 100 लिटर पाणी दिले पाहिजे. हिवाळ्यात व पावसाळ्यात मातीचा ओलसरपणा लक्षात घेऊन पाणी द्यावे.

## रोपांचे संरक्षण :

डेट पामच्या झाडाला कोणत्याही प्रमुख कीटकांचा त्रास होत नाही. डेट पामच्या झाडावर सामान्यत: पाम वीव्हिल आणि ऱ्हिनोसेरस बीटल दिसून येतात. पामच्या झाडांकडे नियमितपणे लक्ष दिल्यास त्यांवर नियंत्रण ठेवता येते.

## उत्पादन/उत्पन्न :

रोप लावल्यापासून चौथ्या वर्षापासून डेट पाम उत्पादन करू लागते. डेट पामच्या झाडांमध्ये नर व मादी झाडे वेगवेगळी असतात. हाताने परागीभवन करावे लागते. झाडावर चांगल्या दर्जाची व चवदार फळे मिळण्यासाठी नीट परागीभवन होणे आवश्यक असते. झाडाला 4 थ्या वर्षात 30 किग्रा फळे लागतात व हे प्रमाण 7 व्या वर्षाच्या शेवटी 200-250 किग्रा इतके वाढते.

## डिस्क्लेमर कलम :

<u>वरील माहिती फक्त लागवडीबद्दल सामान्य मार्गदर्शनाच्या हेतूने दिलेली आहे. प्रत्येक शेतकऱ्याने/लागवडदाराने/ वापरकर्त्याने वरील माहितीचा संदर्भ व उपयोग त्यांच्या स्थानिक/प्रादेशिक जमिनीच्या स्थितीनुसार, हवामानानुसार, शेतीच्या पद्धतींनुसार इ. करणे ही त्यांची जबाबदारी असेल. याच्या वापराच्या दरम्यान कोणतीही हानी/नुकसान झाल्यास त्याबद्दलच्या दाव्याची जबाबदारी के. सी. एस. प्रा. लिमिटेड स्वीकारणार नाहीत.</u>